आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र -संध्याकाळी   ७.०० वाजता

९ नोव्हेंबर २०२४ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- विधानसभा निवडणुकीसाठीचा प्रचार शिगेला / सभा, मुलाखती आणि भेटीगाठींमधून मतदारांपर्यंत पोहचण्याचा उमेदवारांचा प्रयत्न

- महाराष्ट्रातल्या मतदारांनी दूरदृष्टी दाखवून भाजपाला सलग १० वर्षं सर्वाधिक पसंती दिली असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रचारसभेत प्रतिपादन

- महायुतीचं सरकार आल्यानंतर राज्यातली प्रशासन व्यवस्था कोलमडली असल्याची काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांची टीका

- विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर मतदान जनजागृतीसाठी राज्यात विविध कार्यक्रम

**आणि**

- देशातल्या ७ शैक्षणिक संस्थांना क्वाकरेली सिमोंड्स जागतिक मानांकनात आशिया विभागात पहिल्या १०० मधे स्थान, आयआयटी मुंबईचा ४८वा क्रमांक

**<><><><><>**

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकांसाठीच्या प्रचारानं कमालीचा वेग घेतला आहे. विविध राजकीय पक्षांच्या प्रमुख नेत्यांच्या प्रचारसभा आणि पत्रकार परिषद आज राज्यभरात होत आहेत. वृत्तपत्र, वृत्तवाहिन्या आणि इतर समाजमाध्यम व्यासपीठांवर आपापली भूमिका मांडून उमेदवार आणि त्यांच्या पक्षांचे प्रचारक मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत आहेत.

**<><><><><>**

देशाच्या विकासाकरता भाजपा आणि मित्रपक्षच गांभीर्यानं काम करत असल्याची महाराष्ट्रातल्या जनतेला खात्री असल्यानेच गेली दहा वर्षं सर्वाधिक मतं

भाजपाच्या पारड्यात पडत आहेत असं भाजपाचे ज्येष्ठ नेते, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी निवडणूक प्रचारसभेत सांगितलं. नांदेड इथं विधानसभा निवडणूकीतल्या आणि लोकसभा पोटनिवडणुकीतल्या उमेदवाराच्या प्रचारसभेत आज ते बोलत होते.

गेल्या १० वर्षांत सिंचनासाठी राबवलेल्या योजनांचा उल्लेख त्यांनी केला. सव्वा कोटीपेक्षा जास्त शेतकऱ्यांना पीएम किसान सन्मान निधी दिला, सोयाबीन शेतकऱ्यांना आर्थिक मदत सरकारनं केली. गेल्या अडीच वर्षांत मराठवाड्यात ८० हजार कोटीपेक्षा जास्त गुंतवणूक झाल्यामुळे रोजगाराच्या हजारो नव्या संधी उपलब्ध झाल्या असं ते म्हणाले. दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडॉर, रेल कोच फॅक्ट्री, लॉजिस्टिक पार्क, समृद्धी महामार्ग, नांदेडमधून जाणारा शक्तिपीठ एक्सप्रेसवे या सर्व कामांमुळे मराठवाड्याच्या अर्थव्यवस्थेला नवी उंची मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसंच खासदार अशोक चव्हाण सभेला उपस्थित होते.

**अकोला** इथंही आज प्रधानमंत्री मोदी यांनी प्रचारसभा घेतली. पालघर जिल्ह्यातलं वाढवण बंदर देशातलं सर्वात मोठं बंदर असून त्यासाठी ८० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आल्याचं प्रधानमंत्र्यांनी या सभेत सांगितलं.........

**बाईट- नरेंद्र मोदी**

केंद्र सरकारनं मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देऊन संपूर्ण महाराष्ट्राचा गौरव केला आहे, असंही प्रधानमंत्री म्हणाले. राज्यात टेक्सटाइल पार्कच्या उभारणीमुळे कापूस शेतकऱ्यांसाठी नव्या संधी उपलब्ध होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

काँग्रेसनं कायमच लोकशाही आणि संविधान यांचं रक्षण आणि संवर्धन केलं आहे, असं काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी अमरावती इथं प्रचारसभेत सांगितलं. विचारावर, तत्वावर, कामावर टीका करावी व्यक्तिगत टीका करु नये, असंही ते म्हणाले.

नरेंद्र मोदींनी खोटी आश्वासनं दिली, शेतकऱ्यांना हमीभाव, महिलांना सुरक्षितता, तरुणांना रोजगार काहीही मिळालं नाही, असा आरोप खर्गे यांनी केला. महाविकास आघाडीचं सरकार आल्यावर शेतकरी, महिला, युवा यांच्यासाठी कल्याणकारी योजना आणू, असं आश्वासन खर्गे यांनी दिलं.

**बाईट - खर्गे**

त्याआधी मल्लिकार्जुन खर्गे यांनी नागपूर इथं वार्ताहरांशी संवाद साधला. न्याय, कायदा आणि सुव्यवस्थेसाठी ओळखल्या जाणाऱ्या महाराष्ट्राची प्रशासन व्यवस्था महायु ुतीचं सरकार आल्यानंतर कोलमडली आहे, अशी टीका त्यांनी यावेळी केली. महाराष्ट्राला पुन्हा एकदा प्रगतीपथावर आणण्यासाठी ही निवडणूक महत्वाची असल्याचं खर्गे म्हणाले.

**<><><><><>**

काँग्रेसशासित हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री सुखविंदर सुख्खु, तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी तसंच कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डीके शिवकुमार यांनी आज मुंबई इथं पत्रकार परिषद घेऊन भाजपा खोट्या जाहिराती करून लोकांची दिशाभूल करत असल्याचं सांगितलं. तेलंगणा, कर्नाटक आणि हिमाचल प्रदेशात काँग्रेसनं दिलेली आश्वासनं पूर्ण केली असून लोककल्याणकारी योजना राबवल्या आहेत, असं काँग्रेस नेत्यांनी सांगितलं. तिन्ही राज्यात राबवल्या जाणाऱ्या योजनांची माहिती यावेळी त्यांनी दिली.

**<><><><><>**

महायुती सरकारच्या काळात सरकारच्या तिजोरीवर पहिला अधिकार हा शेतकरी, लाडक्या बहिणी आणि लाडक्या भावांचा होता, असं शिवसेनेचे मुख्य नेते, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. ते आज परभणीत प्रचारसभेत बोलत होते.

**<><><><><>**

महायुतीचं सरकार सत्तेत आल्यावर शेतकऱ्यांना पूर्ण कर्जमाफी देऊ अशी घोषणा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. ते आज चंद्रपुरात महायुतीच्या प्रचारसभेत बोलत होते. फडणवीस यांची आज वाशिम मध्ये कारंजा इथंही सभा झाली.

**<><><><><>**

महाविकास आघाडी सरकारच्या कालावधीत साडे सहा लाख कोटींचे सामंजस्य करार करून राज्यात उद्योग आणले, मात्र महायुती सरकारनं सर्व उद्योग गुजरातला नेले, अशी टीका माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली. ते आज नांदेड जिल्ह्यात लोहा-कंधार मतदारसंघातल्या प्रचारसभेत बोलत होते. हिंगोली इथल्या प्रचारसभेलाही ठाकरे यांनी संबोधित केलं.

**<><><><><>**

महाराष्ट्रात यावेळी निवडणूक लढवणाऱ्या पक्षांची आणि उमेदवारांची संख्या जास्त असून त्यामुळे उमेदवारांचा कस लागणार असल्याचं राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी म्हटलं आहे. आज एका वृत्तवाहिनीला ते मुलाखत देत होते. शरद पवार यांनी हिंगोली इथं तसंच बीडमध्ये परळी आणि आष्टी इथल्या सभांनाही संबोधित केलं.

**<><><><><>**

विकासाचं गाजर दाखवून महायुतीनं राज्यातले उद्योग गुजरातला नेले असल्याची टीका महाराष्ट्र काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.

जालना विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार कैलास गोरंट्याल यांच्या प्रचारसभेत आज ते बोलत होते.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर मतदान जनजागृतीसाठी राज्यात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत.

**मुंबईत अंधेरी पश्चिम** विधानसभा मतदारसंघात आज सकाळी ‘सायकल रॅली’ आणि पथनाट्यातून जनजागृती करण्यात आली. विलेपार्ले इथल्या दुभाषी मैदानातून सायकल रॅलीची सुरुवात झाली. यावेळी रॅलीत सहभागी झालेल्या सर्वांना ‘स्वीप’ उपक्रमा अंतर्गत मतदान करण्यासाठी शपथ देण्यात आली.

स्वीप अंतर्गत मतदार जनजागृतीसाठी मुंबईत **घाटकोपर** रेल्वे स्थानकाबाहेर आज पथनाट्य सादर करुन नागरिकांना त्यांचा मतदान प्रक्रियेतील सहभाग वाढवण्याबाबत आवाहन करण्यात आलं.

**नवी मुंबई** महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनी आज मतदानाबाबत सामुहिक प्रतिज्ञा घेतली.

**कोल्हापूर** जिल्ह्यात ८० टक्क्यांहून जास्त मतदानाचं लक्ष्य गाठण्यासाठी लोकशाही दौड आयोजित करण्यात आली. यावेळी सहभागी धावपटूंनी मतदान करण्याचा संकल्प केला.

**अमरावतीमध्ये** मतदार जनजागृतीचा कार्यक्रम आज पार पडला.

**<><><><><>**

**बीड** विधानसभा मतदारसंघात गृह मतदानाला आज सकाळपासून सुरुवात झाली. हे गृह मतदान उद्या संध्याकाळी ५ वाजेपर्यंत सुरु राहणार आहे.

**गडचिरोली** जिल्ह्यातल्या आरमोरी विधानसभा क्षेत्रातील देसाईगंज येथील १०१ वर्षीय श्रीमती ताराबाई शेंडे यांनी गृहमतदान सुविधेचा लाभ घेत आज आपला मतदानाचा हक्क बजावला.

**<><><><><>**

देशातल्या ७ शैक्षणिक संस्थांना क्वाकरेली सिमोंड्स जागतिक मानांकनात आशिया विभागात पहिल्या १०० मधे स्थान मिळालं आहे. त्यात आयआयटी मुंबईला ४८वा क्रमांक मिळाला आहे. आयआयटी दिल्लीला ४४ वा क्रमांक मिळाला असून आयआयटी मद्रास, आयआयटी खरगपूर, आयआयटी कानपूर, भारतीय विज्ञान संस्था, दिल्ली विद्यापीठ यांचा समावेश पहिल्या १०० मानांकनात आहे.

//<><><><><>//